# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 06 August 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – ०६ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- बँकामधली जनधन खाती तसंच मूलभूत बचत खात्यांना किमान शिलकीची अट लागू नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांकडून स्पष्ट
- पालघर जिल्ह्यात ३३ आश्रमशाळांतल्या ४३२ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा-सर्वांची प्रकृती स्थिर
- नांदेड नजिक झरी इथं खाणीत पोहण्यासाठी गेलेल्या चार जणांचा बुडून मृत्यू

आणि

- पॅरीस ऑलिम्पिकमध्ये भालाफेकपटू नीरज चोप्रा अंतिम फेरीत तर कुस्तीपटू विनेश फोगाटची उपांत्य फेरीत धडक

****

बँकामधली जनधन खाती तसंच मूलभूत बचत खात्यांना किमान शिलकीची अट लागू नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केलं आहे. त्या आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात बोलत होत्या. किमान शिलकीच्या अट न पाळल्यास विविध बँकांकडून आकारल्या जाणाऱ्या दंडासंदर्भातल्या प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, अर्थसंकल्पावर लोकसभेत आज चर्चा झाली. स्टार्टअप साठीचा एंजल कर रद्द करण्याच्या अर्थसंकल्पातल्या प्रस्तावाचं भाजपचे निशीकांत दुबे यांनी स्वागत केलं.

****

सायबर गुन्ह्यांचा निपटारा करण्याच्या उद्देशानं, देशभरात आतापर्यंत १ कोटी ९२ लाख सीम कार्डांची सेवा खंडित करण्यात आली आहे. राज्यसभेत आज अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. सायबर घोटाळा प्रकरणात सरकार शून्य सहिष्णूता धोरण अंमलात आणत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत, आतापर्यंत ११ कोटी लाभार्थ्यांना तीन कोटी २४ लाख रुपयांचा लाभ हस्तांतरीत करण्यात आला आहे. केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. आतापर्यंत थेट लाभ हस्तांतरणाद्वारे लाभार्थ्यांना १७ हप्ते जारी करण्यात आल्याची माहिती, मंत्री ठाकूर यांनी यावेळी दिली.

****

बांग्लादेशातल्या अल्पसंख्याकांच्या स्थितीवर पूर्ण लक्ष ठेवून असल्याचं, भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी सांगितलं आहे. बांग्लादेशात उद्भवलेल्या राजकीय संकटाच्या पार्श्वभूमीवर आज संसदेत या प्रकरणी केलेल्या निवेदनात जयशंकर यांनी, सध्या बांग्लादेशात १९ हजार भारतीय नागरिक असल्याचं सांगितलं. यामध्ये नऊ हजार विद्यार्थ्यांचा समावेश असून, भारतीय दूतावासाच्या आवाहनानंतर बहुतांश विद्यार्थी गेल्या महिन्यातच भारतात परतल्याचं जयशंकर यांनी सांगितलं. सध्याची परिस्थिती पाहता सीमा सुरक्षा दलाला सतर्क राहण्याचे निर्देश दिल्याची माहिती जयशंकर यांनी दिली.

****

दरम्यान, बांग्लादेशात आंदोलकांनी अंतरिम सरकार स्थापनेची रूपरेषा निश्चित केली आहे. नोबेल पुरस्कार विजेते अर्थतज्ज्ञ डॉ मोहम्मद युनूस यांना अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार म्हणून पद स्वीकारण्याचा प्रस्ताव देण्यात आला असून, युनूस यांनी तो स्वीकारल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. बांग्लादेशात १९७१ च्या युद्धातल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांना सरकारी नोकरीत आरक्षण देण्याच्या विरोधात विद्यार्थी संघटनांनी हे सरकारविरोधी आंदोलन सुरु केलं आहे.

****

आरोग्य विमा तसंच जीवन विम्यावरील वस्तू आणि सेवा कर जीएसटी मागे घेण्याच्या मागणीसाठी आज संसदेच्या परिसरात इंडिया आघाडीच्या वतीनं निदर्शनं करण्यात आली. खासदार बळवंत वानखेडे यांनी, केंद्र सरकारने वस्तू आणि सेवा कर जीएसटी कायदा लागू करुन लघू, मध्यम उद्योग आणि व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान केल्याचा आरोप यावेळी केला.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज दिल्लीत दाखल झाले. या दौऱ्यात ते काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, यांच्यासह आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष आदी इंडिया आघाडीच्या नेत्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधणार असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, ठाकरे यांच्या दिल्ली दौऱ्यावर शिवसेना उपनेते संजय निरुपम यांनी टीका केली आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या काळात राष्ट्रीय नेते चर्चेसाठी मातोश्रीवर सेत असत, मात्र उद्धव ठाकरे हे सत्तेच्या लालसेपोटी दिल्लीत काँग्रेसपुढे लोटांगण घालत असल्याचं निरुपम यांनी म्हटलं आहे.

****

राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून पुरस्कारासाठी अर्ज करण्याचं आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्रालयाकडून करण्यात आलं आहे. पहिल्या तीन विजेत्या क्रमांकांना अनुक्रमे पाच लाख, अडीच लाख आणि एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. राज्यातील अधिकाधिक मंडळांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असं आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलं आहे.

****

पालघर जिल्ह्यातल्या ३३ आश्रमशाळांमधल्या ४३२ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाली. जवळपास १२६ विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या ग्रामीण रुग्णालयात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचं जिल्हा शल्यचिकित्सकांनी कळवलं आहे. जिल्ह्यातल्या ३३ आश्रम शाळांमधल्या विद्यार्थ्यांना बोईसर जवळील बेटेगाव इथल्या मध्यवर्ती स्वयंपाकघरातून दररोज नाष्टा आणि जेवण पुरवल जातं. या सर्व जेवणाचे नमुने आरोग्य विभागाकडून जमा करण्यात येत असून ते तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अजिंठा गावातली पाणी टंचाई परिस्थिती दूर करण्यासाठी तसंच या भागातील शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष दुरूस्ती तसंच विस्तार योजनेअंतर्गत पूलवजा बंधारा प्रकल्पाच्या पुनर्रचनेसंदर्भातील कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले आहेत. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गतची कामांचा सत्तार यांनी आज मंत्रालयात आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या भागात विविध योजनांसाठीच्या निविदा तातडीने काढण्याच्या सूचनाही सत्तार यांनी दिल्या.

****

नांदेड शहराजवळील झरी इथल्या खाणीत पोहण्यासाठी गेलेल्या चार जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना आज घडली. शहरातले पाच जण या खाणीत पोहण्यासाठी उतरले होते, त्यापैकी तिघांना पोहता येत नव्हतं, यावेळी एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात चौघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. काझी मोजमिल, आफन, सय्यद सिद्दीकी आणि शेख फुझायल अशी मृतांची नावे आहेत. महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या मदतीनं चारही मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात आले असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

पॅरीस ऑलिम्पिक स्पर्धेत भालाफेक प्रकारात भारताच्या नीरज चोप्राने अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज झालेल्या पात्रता फेरीत नीरजने पहिल्याच प्रयत्नात सर्वाधिक ८९ पूर्णांक ३४ दशांश मीटर लांबवर भाला फेकून अंतिम फेरीत सर्वात पहिलं स्थान निश्चित केलं. भालाफेक स्पर्धेची अंतिम फेरी आठ ऑगस्टला होणार आहे.

कुस्तीच्या ५० किलो वजनी गटात भारताच्या विनेश फोगाटने उपांत्यफेरीत धडक मारली आहे. आज दुपारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत विनेशने युक्रेनच्या महिला मल्लाचा ७-५ असा पराभव करत, उपांत्य फेरी गाठली. आज रात्री दहा वाजल्यानंतर तिची क्यूबाच्या प्रतिस्पर्ध्याशी उपांत्यफेरीची लढत होणार आहे.

हॉकीमध्ये भारताचा उपान्त्य फेरीचा सामना जर्मनीसोबत होणार आहे. भारतीय वेळेनुसार रात्री साडे दहा वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

पुरुष टेबल टेनिस मध्ये उपांत्यपूर्व फेरीत आज भारताला पराभवाचा सामना करावा लागला. महिलांच्या टेबल टेनिस स्पर्धेत उद्या मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत या खेळाडूंच्या चमूची उपांत्यपूर्व फेरीची लढत होणार आहे.

****

भारतीय प्रसिद्ध टेनिसपटू लिएंडर पेस यांनी आज महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेममध्ये विजय अमृतराज यांच्यासह स्थान प्राप्त केल्याबद्दल लिएंडर पेस यांचे अभिनंदन केलं.

****

मुंबईत रस्त्यात पडलेल्या खड्ड्यांच्या प्रश्नी आज मुंबई राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रस्ते व वाहतूक प्रमुख अभियंता, वरळी यांच्या दालनासमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या.

****

बीड इथं शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्यांनी आज नगरपालिकेत ठिय्या आंदोलन केलं. शहरातल्या नागरिकांच्या मुलभूत सुविधा आणि समस्या सोडवण्यात नगरपालिका प्रशासन अपयशी ठरतं असल्यानं, हे आंदोलन करण्यात आलं. शिवसंग्रामच्या ज्येष्ठ नेत्या राष्ट्रीय अध्यक्ष ज्योती मेटे यांच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी नीता अंधारे यांना विविध मागण्यांचे निवेदन यावेळी सादर केलं.

****

विशाळगडावर घडलेल्या हल्ला प्रकरणी कोल्हापूरचे पोलिस अधीक्षक तसंच जिल्हाधिकारी यांना निलंबित करण्याची मागणी स्वराज अभियान आणि इतर संघटनांनी केली आहे. या घटनेचं तथ्यशोधन विविध संस्थांनी गेल्या आठवड्यात घटनास्थळी जाऊन पाहणी केली, तसंच माहिती घेतली. त्यानंतर आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ही मागणी करण्यात आली

****

जागतिक स्तनपान सप्ताह निमित्त, छत्रपती संभाजीनगर शहरात एन आठ भागातल्या महानगरपालिका रुग्णालयात आज जनजागृती करण्यात आली. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ अर्चना राणे यांच्या अध्यक्षतेखाली ही जनजागृती करण्यात आली. हा सप्ताह एक ऑगस्ट ते उद्यापर्यंत राबवण्यात येणार आहे.

****

नाशिक जिल्ह्यात झालेल्या पावसामुळं धरण क्षेत्रातल्या पाणी साठ्यात वाढ झाली आहे. नांदूरमध्यमेश्वर धरणातून सध्या १५ हजार २७४ घनफुट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. दरम्यान छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पैठण इथल्या नाथसागर धरणाची पाणी पातळी १ हजार ५०३ फुटांवर पोहोचली असून, उपयुक्त पाणी साठा २२ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात सध्या ५७ हजार ३१७ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याची आवक होत असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****